# माझें जीवन आणि कार्य



REFBK-0010859

कृष्ण आश्रम,
गपूर.

स्वामी विवेकानंद

प्रकाशक :
स्वामी भास्करेश्वरानंद
अध्यक्ष, श्रीरामकृष्ण आश्रम,
धंतोली, नागपूर–१.

श्रीरामकृष्ण-शिवानंद-स्मृतिग्रंथमाल
पुष्प २२ वें
(श्रीरामकृष्ण आश्रम, नागपूर द्वारा सर्वाधिकार

किंमत ६५ न. पै.

मुद्र
डी. पी.
बजरंग
कर्नलबाग,

અનુક્રમ ૨૭૭૬૬

વિભાગ નિબંધ

ક્રમાંક

નોં. દિ. ૨૧/૧૨/૬૦

# निवेदन

स्वामी विवेकानंदकृत 'माझें जीवन आणि कार्य' हें
तक प्रसिद्ध करतांना आम्हांला आनंद होत आहे.
डेना (कॅलिफोर्निया) येथील 'शेक्सपिअर क्लब' मध्ये
२७ जानेवारी १९०० रोजीं स्वामी विवेकानंदांनी
सुप्रसिद्ध इंग्रजी व्याख्यान ('My Life and
ission') दिलें होतें त्याचाच मराठी अनुवाद प्रस्तुत
तकाच्या रूपाने वाचकांच्या हातीं देण्यांत येत आहे. या
ाख्यानांत आपल्याला स्वामी विवेकानंदाच्या जीवनाचें
र्शन तर होतेंच, पण त्याबरोबरच त्यांचें विशाल हृदय
नेक प्रकारचीं दुःखें भोगणाऱ्या आपल्या लाखो-करोडो
ांधवांच्या उन्नतीसाठी कसें तिळतिळ तुटत होतें आणि
आपल्या प्रिय मातृभूमीला तिचें पूर्वीचें वैभव प्राप्त करून
देण्यासाठी त्यांनीं कोणती योजना आखली होती याचें
स्पष्ट चित्र आपल्या समोर उभें राहतें. स्वतःच्या जीवना-
विषयी, हृदयांतील प्रचंड खळबळीविषयी आणि त्यामुळे

होणाऱ्या तीव्र वेदनांविषयी इतक्या स्पष्ट व परिणा कारक शब्दांत जाहीर रीतीने लोकांसमोर बोलण्य स्वामी विवेकानंदांच्या आयुष्यांतील फक्त हाच एक प्र होता, आणि म्हणूनच त्यांच्या या व्याख्यानाचें व विशेष महत्त्व आहे.

श्री. गणेश सदाशिव वझे, बी. ई., पुणें, यांनी इंग्रजी पुस्तकाचा हा सुरस अनुवाद करून दिल्या आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोंत.

स्वामी विवेकानंदांच्या या वैशिष्टयपूर्ण व्याख्यान वाचक सहर्ष स्वागत करतील अशी आशा आहे.

नागपूर,
दि. १–१०–१९६०

—प्रकाश

REFBK-0010859



स्वामी विवेकानन्द

ग्रा. क्र. १०८५९

# माझें जीवन आणि कार्य

सभ्य स्त्रीपुरुषहो, आजच्या सकाळच्या व्याख्यानाचा विषय वास्तविक 'वेदान्त तत्त्वज्ञान' असा होता. हा विषय मूलतःच चित्तवेधक आहे; पण त्याबरोबरच तो थोडाबहुत रुक्ष आणि फार विस्तृत, असाहि आहे.

परंतु दरम्यान तुमचे अध्यक्ष व येथील कांही स्त्रीपुरुष, यांनी मला 'माझें उद्दिष्ट व त्यासंबंधी मी हल्ली करीत असलेलें कार्य' याविषयी कांही सांगावें अशी विनंती केली आहे. सदर विषय हा येथील कांही लोकांना मनोवेधक वाटत असेल; पण मला स्वतःला मात्र तो तितकासा मनोवेधक वाटत नाही. इतकेंच काय, पण खरोखर या विषयावर बोलण्याची माझ्या आयुष्यांतील ही पहिलीच वेळ असल्याने, हा विषय तुमच्यापुढे कसा मांडावा हें तितकें चांगलेसें माझ्या ध्यानांत येत नाही.

आता माझ्यापरीने जें काय थोडेंबहुत कार्य कर-ण्याचा मी प्रयत्न करीत आहें तें तुम्हांस नीट समजावें

म्हणून, प्रथमतः मी तुम्हांस कल्पनेने भारतांत घेऊन जातों. या विषयांतील सर्व बारीकसारीक तपशील व त्याचे सर्व विस्तार, यांचें संपूर्ण विवेचन करण्यास आपणांस वेळ नाही. शिवाय एका परकीय वंशाच्या सर्व सांस्कृतिक घडणीची गुंतागुंत, या थोड्याशा वेळांत तुमच्या ध्यानांत येऊं शकणार नाही. म्हणून तूर्त भारत हा कशा प्रकारचा देश आहे याचें थोडेसें चित्र तुमच्यापुढे रेखाटण्याचा निदान प्रयत्न तरी मी आता करणार आहें.

भारत म्हणजे जणु काय पार कोसळून गेलेली व उध्वस्त झालेली अशी एक जगड्व्याळ इमारतच आहे, तेव्हा सकृत्दर्शनीं त्या ठिकाणीं आशा करण्याला फार थोडी जागा दिसते. हें राष्ट्र नष्ट व वाताहत झालेलें आहे असें वाटतें. पण तुम्हीं जरा थांबून अभ्यासपूर्वक दृष्टि दिलीत, तर यापलीकडेहि तुम्हांस आणखी कांही गोष्टी दिसतील. वास्तविक सत्य असें आहे की, मनुष्याचें बाह्य आवरण हें त्याच्या तत्त्वाचें अगर ध्येयाचें केवळ एक आविष्करण असून, जोंपर्यंत तें तत्त्व अगर ध्येय यांस

धक्का लागलेला नसतो, अगर तें नष्ट झालेलें नसतें, तोंपर्यंत त्या मनुष्याचा जिवंतपणा कायम असतो, आणि त्याच्याविषयी आशा करण्यासहि जागा असते. तुमचा अंगरखा जरी वीस वेळां चोरीस गेला, तरी त्यामुळे तुमचें अस्तित्व नष्ट होण्याचें कांहीच कारण नाही; कारण नवीन अंगरखा तुम्ही मिळवूं शकतां. अंगरखा ही कांही जीवनावश्यक वस्तु नाही. एखादा श्रीमंत मनुष्य लुबाडला गेला, म्हणून तेवढ्याने त्याच्या जीवनशक्तीस धक्का पोहचत नाही, अगर त्यामुळे तो मृत झाला असाहि त्याचा अर्थ होत नाही. त्यानंतरहि त्याचा जीवनक्रम चालू असतो.

७ या सिद्धान्ताच्या आधारें जर आपण भारतांत डोकावून पाहूं लागलों तर आपणांस काय दिसतें ? भारत ही कांही आता राजकीय शक्ति राहिलेली नाही. तो गुलामगिरींत पडलेला आहे. हिंदी लोकांना स्वतःचा राज्यकारभार आपल्या मताप्रमाणे चालविण्याचा कोणताच अधिकार नाही. आज तीस कोटी भारतीयांची स्थिति ही खरोखर गुलामांच्या स्थितीपेक्षा कांही अधिक चांगली

नाही. हिंदुस्थानांतील मनुष्याचें सरासरीचें मासिक उत्पन्न दोन शिलिंग आहे. असंख्य अशा सर्वसामान्य जनतेच्या बाबतींत, अर्धपोटीं राहावें लागणें ही नेहमीची गोष्ट आहे. त्यामुळे अर्थातच उत्पन्नांत थोडीशीहि घट झाली तरी लक्षावधि लोक मृत्युमुखीं पडतात. थोडासा दुष्काळ म्हणजे मृत्युच ! तेव्हा भारतांतील या बाजूकडे मी पाहूं लागलों तरी तेथेहि मला वाताहत—निराशाजनक अशी वाताहत—दिसते.

पण आपणांस असें आढळून येतें की, भारताने ‘ संपत्ति ’ हें केव्हाच आपलें उद्दिष्ट ठेवलें नव्हतें. दुसऱ्या कोणत्याहि देशाने जितकी संपत्ति कधी मिळविली असेल, त्यापेक्षाहि कदाचित् जास्तच अशी प्रचंड संपत्ति त्याने मिळविली; आणि तरी देखील ‘ संपत्ति ’ हें त्याने आपलें ध्येय मानलें नाही. कित्येक शतकें भारत हा एक बलिष्ठ देश होता. आणि तरीहि आपणांस असें दिसून येईल की, त्या राष्ट्राने ‘ सत्ता ’ हें कधीच आपलें ध्येय मानलें नाही; आणि प्रदेश जिंकण्यासाठी म्हणून कधीच देशा-

बाहेर पाऊल ठेवलेलें नाही. स्वतःच्या देशाच्या मूळच्या सीमांतच ते लोक पूर्ण समाधानी असून, त्यांनी कधीहि कोणाशीं युद्ध केलें नाही. कारण साम्राज्याचें वा सार्वभौमपणाचें वैभव हें भारताने आपलें इष्टसाध्य असें कधीहि मानलें नाही. एकंदरींत काय की, संपत्ति व सत्ता हें कांही भारताचें साध्य नव्हतें.

तर मग दुसरें होतें तरी काय ? तें हेंच की, भारताने असा विश्वास धरलेला आहे की, ऐहिक जीवन ही कांही सत्यवस्तु नाही. हा विश्वास बरोबर आहे की चूक आहे, हा कांही प्रस्तुतचा प्रश्न नाही. पण एवढें खरें की, सर्व मानवी वंशांत एकटया भारतानेच अशा तऱ्हेचा विश्वास धरलेला असून, त्याचा तो विश्वास अत्यंत दृढ आहे. भारताच्या मताप्रमाणे ऐहिक जीवन ही कांही सत्य वस्तु नाही, सत्य आहे केवळ परमेश्वरच. आणि म्हणून संकटें येवोत अगर जावोत, त्या परमेश्वरालाच निश्चयाने चिकटून राहण्याचें त्याने ठरविलें आहे. यामुळेच अवनतीच्या काळांतहि भारतांत धर्माचें स्थान वरचें राहिलेलें

आहे. हिंदु मनुष्याची पाणी पिण्याची क्रियाहि धार्मिक पद्धतीची असते; व त्याचप्रमाणे निद्रा घेणें, चालणें, अगर विवाहबद्ध होणें इत्यादि सर्व क्रियाहि तो धार्मिक पद्धतीनेच करतो. फार काय, पण चोरीसुद्धा तो धार्मिक पद्धतीनेच करतो.

अशा तऱ्हेचा देश तुम्हीं कधीतरी पाहिला आहे काय? कोणा एखाद्याला जर एखादी चोरांची टोळी उभी करावयाची असेल तर त्या म्होरक्याला प्रथमतः लोकांसमोर कांहीतरी धार्मिक शिकवण ठेवली पाहिजे. त्यानंतर अतींद्रिय शास्त्रांतील कांही बनावट सिद्धान्तांची मांडणी केली पाहिजे. आणि "परमेश्वरप्राप्तीचा सर्वांत सोपा व अत्यंत जलद असा हाच मार्ग आहे" असें त्याने लोकांना सांगितलें पाहिजे. असें त्याने केलें तरच त्याला अनुयायी मिळतील, एरवी नाही. यावरून असें दिसून येईल की, हिंदुवंशाचा जीवनहेतु आणि त्याचें उद्दिष्ट धर्म हेंच आहे. आणि या जीवनहेतूला अजून धक्का लागलेला नसल्यामुळेच तो वंश अद्यापहि जिवंत आहे.

रोमचें उदाहरण घ्या. रोमचें ध्येय साम्राज्यसत्ता आणि त्याचा विस्तार हें होतें. आणि त्याला धक्का लागल्याबरोबर, रोमचे तुकडे तुकडे होऊन तें नाहीसें झालें. ग्रीसचें ध्येय ‘ बुद्धिमत्ता ’—बौद्धिक प्रगति––हें होतें आणि त्याला धक्का लागल्याबरोबर मग ग्रीसहि नामशेष होऊन गेलें तीच गोष्ट हल्लीच्या काळांतील स्पेन व इतर सर्व आधुनिक राष्ट्रांची आहे. प्रत्येक देशाला जगासंबंधाने एक उद्दिष्ट व जीवनहेतु असतो. जोंपर्यंत त्या उद्दिष्टाला धक्का लागत नाही, तोंपर्यंत कोणतेंहि संकट आलें तरी तें राष्ट्र जिवंत राहतें. पण तें उद्दिष्ट नष्ट झालें तर मग मात्र लगेच तें राष्ट्र कोलमडून पडतें.

आता भारताच्या बाबतींत त्याचें उद्दिष्ट व जीवनहेतु यांना म्हणजेच त्याच्या प्राणशक्तीला अद्याप धक्का लागलेला नाही. त्याने अद्याप त्याचा त्याग केलेला नसून, कितीहि वेडगळ समजुती वा धर्मभोळेपणा त्याच्या ठिकाणीं असला, तरीहि हा जीवनहेतु मात्र अद्यापहि बळकट आहे. भारतांत धर्मभोळेपणा वा वेडगळ समजुती हिडिस

व कांही अत्यंत किळसवाण्या आहेत, हें खरें. पण असें असलें तरीहि भारताचा जो राष्ट्रीय जीवनहेतु, आणि त्याचें जें वांशिक उद्दिष्ट, तें अद्यापहि त्या ठिकाणीं खास जिवंत आहे.

भारत हें बलिष्ठ आणि इतर देश पादाक्रांत करणारें असें राष्ट्र कधीच होणार नाही—कालत्रयींहि नाही. राजकीय सामर्थ्यानें संपन्न असेंहि तें कधी होणार नाही, कारण तें त्याचें कार्यच नव्हे. सर्व देशांच्या भव्य सुसंवादित्वांत भारताने मिसळावयाचा सूर हा कांही अशा प्रकारचा नाही तर मग तो सूर आहे तरी कोणता ? तर 'ईश्वर आणि केवळ ईश्वर' हाच तो सूर आहे. कठोर अशा दृढतेने भारत त्याला चिकटून राहिलेला आहे; आणि म्हणूनच त्याच्या ठिकाणीं आशेला अद्यापहि जागा आहे.

तर मग, या पृथक्करणानंतर, तुम्हांला असें दिसून येईल की, हें सगळें दारिद्र्य, दैन्य इत्यादि सर्व गोष्टी, यांना कांहीच महत्त्व नाही. कारण राष्ट्रपुरुष हा अद्यापहि जिवंत आहे, आणि म्हणून आशेला जागा आहे.

ठीक आहे. आता तुम्हांला असें दिसेल की, सर्व देशभर धार्मिक हालचाली चालू आहेत. ज्या वर्षी भारतांत अनेक धार्मिक पंथ उत्पन्न झाले नाहीत असें एकहि वर्ष मला आठवत नाही. पाण्याचा प्रवाह जितका अधिक जोरदार तितके त्यांत भोवरे व चक्रया ह्या अधिक असतात. अनेक पंथांचें अस्तित्व हें अवनतीचें चिन्ह नव्हे, तर जिवंतपणाचें लक्षण आहे. प्रत्येक व्यक्तिगणिक एकेक पंथ, इतकी जरी पंथांची संख्या वाढण्याची वेळ आली तरी त्यासहि हरकत नाही. त्याबद्दल तंटाभांडण करण्याचें आपणांस कांहीच कारण नाही.

आता तुमच्या देशाचें उदाहरण घ्या. (मी कांही हें टीका करण्याकरिता सांगत नाहीं.) या ठिकाणीं सामाजिक कायदे, राजकीय घटना, नव्हे प्रत्येक गोष्ट ही मनुष्याचें ऐहिक जीवन सुखाचें व्हावें याकरिता केली जाते. जोंपर्यंत तो या पृथ्वीतलावर आहे, तोंपर्यंत त्याने आपलें आयुष्य अत्यंत सुखाने घालवावें. तुमचे रस्ते पाहाना—किती निर्मळ ! त्याचप्रमाणे सौंदर्यशाली

शहरें ! आणि पैसे मिळविण्याकरिता मनुष्यास उपलब्ध असणारे कितीतरी मार्ग ! तसेंच या जीवनांतील आनंद उपभोगण्याचे कितीतरी नानाविध प्रकार ! पण येथील एखादा मनुष्य जर असें म्हणेल की, "हें पाहा, मी या झाडाखाली बसून ध्यान करणार आहें. मला उद्योग करावयाचा नाही",—तर मग काय, त्याला तुरुंगाचा रस्ता सुधारावा लागेल. आता पाहा की, त्याला त्याच्या स्वतःच्या इष्ट कार्याकरिता मुळीच संधि मिळूं शकत नाही —अगदी अजीबात मिळूं शकत नाही. जो माणूस समाजाच्या ठराविक चाकोरींतून जात असेल,तोच ह्या समाजांत आपलें जीवन जगूं शकतो. सबब, ऐहिक सुखोपभोगाच्या ह्या धांवपळींत मनुष्याला सामील व्हावेंच लागतें. कारण तसें तो न करील तर त्याचा मृत्यु हा ठेवलेलाच.

आता आपण पुन्हा भारताकडे वळूं या. तेथे जर एखादा माणूस म्हणेल की "मी गिरीशिखरावर जाणार आहें, आणि नासाग्रावर दृष्टि ठेवून माझें आयुष्य घालवणार आहें" तर प्रत्येकजण त्याला म्हणेल की "खुशाल

जा, शुभास्ते पंथानः सन्तु." त्या माणसाला अधिक एक शब्दहि बोलण्याची जरूर नाही. कोणीतरी त्याला मामुली वस्त्र आणून देईल आणि त्याचें ठाकठीक चालूं लागेल. पण जर एखादा मनुष्य असें म्हणेल की "हें पाहा, मी जरा या आयुष्यांतली चैन उपभोगणार आहें," तर त्याला कोणीहि दरवाजांत उभे करणार नाही.

आता मी असें म्हणेन की, दोन्ही देशांच्या या कल्पना अन्यायी आहेत. येथील एखाद्या माणसाला आवडत असेल तर त्याने मांडी घालून नासाग्रावर दृष्टि लावून कां बसूं नये, याचें कांही एक कारण मला दिसत नाही. येथील बहुतेक लोक जें करतात तेंच प्रत्येकानेहि काय म्हणून करावें ? मला याचें कांहीच कारण दिसत नाही.

त्याचप्रमाणे भारतांत एखाद्या माणसाने पैसे मिळवून सुखोपभोग कां घेऊं नये, याचेंहि कांही कारण मला दिसत नाही. परंतु लक्षावधि लोकांना, त्यांच्या मताच्या विरुद्ध असा दृष्टिकोन केवळ जबरदस्तीने कसा स्वीकारावा लागतो, तें आता तुम्हांस दिसून येईल. ही जुलूम-

जबरदस्ती ऋषिमुनींनी केलेली आहे—महनीय व्यक्तींनी केलेली, अध्यात्मिक श्रेष्ठींनी केलेली, बुद्धिमान् लोकांनी केलेली, आणि ज्ञान्यांनी केलेली आहे. लक्षांत ठेवा की, अज्ञानी माणसांच्या जुलूमजबरदस्तीपेक्षा शहाण्यांनी केलेली जुलूमजबरस्ती ही फार जास्त प्रभावी असते. ज्ञानी आणि बुद्धिमान् लोक जेव्हा आपलीं मतें दुसऱ्यावर लादण्याचे ठरवितात, तेव्हा तऱ्हतऱ्हेच्या उपायांनी ते अशीं बंधनें व मर्यादा घालूं शकतात, की ज्या तोडण्याची शक्ति अज्ञ लोकांमध्ये असूं शकत नाही.

आता माझे म्हणणें असें की, ही गोष्ट बंद झालीच पाहिजे. एक उच्चकोटीचा आध्यात्मिक पुरुष निर्माण करण्याकरिता, लक्षावधि लोकांचें बलिदान करावें लागल्यास त्याचा काय उपयोग ? ज्या ठिकाणीं अतिश्रेष्ठ आध्यात्मिक महापुरुष निर्माण करतां येऊन, शिवाय बाकीचे लोकहि सुखामध्ये राहतील, अशा तऱ्हेचा समाज निर्माण करणें जर शक्य असेल, तर तें हवें आहे. पण जर त्याकरिता लाखो लोकांना भरडून काढावें लागत

असेल, तर तें न्याय्य नव्हे. त्यापेक्षा जगाच्या कल्याणाकरिता एकाच महापुरुषाने आत्मक्लेश भोगणें हें अधिक चांगलें.

प्रत्येक देशांत तुम्हांला त्यांच्या पद्धतीनुसार काम केलें पाहिजे. प्रत्येक माणसाशीं बोलतांना तुम्हांला त्याच्याच भाषेंतून बोललें पाहिजे. आता इंग्लंड अगर अमेरिका येथे जर तुम्हांस धर्मोपदेश करावयाचा असेल, तर तुम्हांस राजकीय पद्धतीचें अवलंबन करावयास हवें; म्हणजे मंडळें, संस्था, त्यांचें सामान्य व गुप्त मतदान, अध्यक्ष, इत्यादि सर्व गोष्टी केल्या पाहिजेत. कारण पश्चिमी वंशाची ती भाषा आहे, त्यांची ती कार्यपद्धति आहे. उलटपक्षीं भारतांत जर तुम्हांस राजकारणाविषयी बोलावयाचें असेल, तर तें तुम्हांस धर्माच्या भाषेंत बोललें पाहिजे. "जो मनुष्य दररोज सकाळीं आपलें घर स्वच्छ करतो, त्याला अमुक इतकें पुण्य मिळेल, स्वर्गलोक प्राप्त होईल, अगर परमेश्वर-प्राप्ति होईल" अशा प्रकारच्या भाषेंत तुम्हांला त्यांच्याशीं बोललें पाहिजे. अशा प्रकारची

भाषा वापरल्याशिवाय ते तुमचें म्हणणें ऐकून घेणार नाहीत. हा केवळ भाषेच्या प्रकाराचा प्रश्न असून, त्याने झालेलें प्रत्यक्ष कार्य हें एकच आहे. पण प्रत्येक वंशाच्या लोकांच्या बाबतींत तुम्हांला त्यांच्या भाषेंतच बोललें पाहिजे; कारण त्यामुळेच तुमचें म्हणणें त्यांच्या हृदयाला स्पर्श करूं शकेल. आणि खरोखर हें रास्तहि आहे. तेव्हा त्याबद्दल आपण व्यर्थ कुरकुर करतां कामा नये.

मी ज्या पंथाचा अनुयायी आहें, त्यांतील व्यक्तींना 'संन्यासी' म्हणतात. "ज्याने त्याग केला आहे असा मनुष्य" असा या शब्दाचा अर्थ आहे. हा पंथ अगर ही परंपरा, ही खूपखूप पुरातन अशी आहे. ख्रिस्तपूर्व ५६० वर्षांच्या कालांतील बुद्ध देखील या परंपरेंतीलच होता. फक्त या परंपरेंतील तो सुधारणावादी होता, इतकेंच काय तें. कितीतरी प्राचीन आहे ही परंपरा! जगांतील सर्वांत पुरातन ग्रंथ जे वेद, अशा त्या आद्य वेदग्रंथांतहि तुम्हांस याचा उल्लेख आढळेल. पूर्वी भारतांत असा नियम होता की, प्रत्येक स्त्रीपुरुषाने आपल्या आयुष्याच्या अखेरीस

सामाजिक जीवनांतून पूर्ण निवृत्त होऊन, परमेश्वर आणि मुक्ति यांच्या चिंतनांतच केवळ निमग्न राहावें. आयुष्यांतील त्या महान् घटनेचें—मृत्यूचें—स्वागत करण्याकरिता ही तयारी असे. आणि म्हणून वृद्ध लोक त्या जुन्या काळांत संन्यासी होत असत. पुढे पुढे तरुण लोकहि ऐहिकाचा त्याग करूं लागले. परंतु तरुण लोक हे कार्यप्रवण असल्यामुळे, एखाद्या झाडाखाली बसून सर्वकाळ आपल्या मृत्यूचें चिंतन ते करूं शकत नसत. तेव्हा सर्वत्र संचार करून, धर्मोपदेश व नव संप्रदायांची स्थापना इत्यादि कार्यें ते करूं लागले. याच पद्धतीस अनुसरून, वयाने तरुण असल्यामुळे बुद्धाने त्या महान् धार्मिक सुधारणेस आरंभ केला. तो वृद्ध असता तर त्याने नासाग्रावर दृष्टि ठेवून शांतपणें मृत्यूचा स्वीकार केला असता.

हा पंथ अगर ही परंपरा म्हणजे कांही स्वतंत्र धर्मसंप्रदाय नव्हे; तसेंच तो अनुसरणारे लोक म्हणजे भिक्षुकहि नव्हेत. भिक्षुक आणि संन्यासी यांत संपूर्णतया

फरक आहे. भिक्षुकी अगर उपाध्येपण हा भारतांत समाजांतील इतर धंद्यांप्रमाणेच एक आनुवंशिक धंदा आहे. ज्याप्रमाणे सुताराचा मुलगा सुतार होईल, अगर लोहाराचा मुलगा लोहार होईल, त्याचप्रमाणे भिक्षुकाचा मुलगा भिक्षुक होईल. भिक्षुकाने लग्न हें केलेंच पाहिजे. कारण पत्नीशिवाय पुरुषाला पूर्णत्व येत नाही, असें हिंदूंचें मत आहे. आणि म्हणून अविवाहित मनुष्याला धार्मिक विधि करण्याचा अधिकार नसतो.

संन्यासी धनसंचय करीत नाहीत. तसेंच ते विवाहहिं करीत नाहीत. या दोन गोष्टींव्यतिरिक्त या पंथाचे अगर परंपरेचे आणखी कांही सांप्रदायिक विधिनियम नाहीत. या पंथांतील एकमेव बंधन म्हणजे गुरु व शिष्य यांचा परस्परसंबंध. आणि हा संबंध म्हणजे भारताचें एक वैशिष्ट्य आहे. मला केवळ शिकविण्याकरिताच एखाद्या माणसाने यावें, व मीं त्याला त्याबद्दल अमुकएक पैसे द्यावेत, म्हणजे तो मग माझा गुरु झाला, इतका मर्यादित असा हा संबंध नसतो. भारतांत हा संबंध म्हणजे खरोखर

दत्तविधानासारखा आहे. माझ्या जनक पित्यापेक्षा गुरु हा अधिक श्रेष्ठ असून, मी म्हणजे त्याचें एक खरोखरचें अपत्य व सर्व बाबतींत पुत्रच असतों. गुरूचें आज्ञापालन आणि त्याचेविषयी पूज्यबुद्धि हें माझें सर्वप्रथमचें—अगदी प्रत्यक्ष जनक पित्यापेक्षाहि प्रथमचें—असें कर्तव्य असतें. त्याचें कारण असें सांगितलें जातें की, बाप हा फक्त शरीर देतो, पण मुक्तीचा मार्ग मात्र गुरुच दाखवितो; आणि म्हणून बापापेक्षा तो अधिक श्रेष्ठ असतो. गुरूविषयीचें हें प्रेम आणि हा आदर आमच्या हृदयांत जन्मभर वास करीत असतो. सर्व पंथ शिस्तबद्ध राखण्याकरिता अस्तित्वांत असलेला नियम म्हटला तर फक्त हा एवढाच. ह्याच पद्धतीने मी माझ्या शिष्यांचें ग्रहण करतों. कधी कधी गुरु तरुण व शिष्य अगदी वृद्ध असेंहि होईल. पण म्हणून काय झालें? असें असलें तरीहि तो माझा पुत्रच आहे. तो मला 'पिता' असें म्हणतो व मलाहि त्याला पुत्र—अगर कन्या वगैरे—असेंच संबोधावें लागतें.

मला जे सद्‌गुरु लाभले ते वयोवृद्ध होते. त्यांची घडण अगदी वेगळ्या प्रकारची होती. बौद्धिक विद्वत्ता मिळविण्याची फारशी खटपट त्यांनी केली नाही व पुस्तकांचा अभ्यास क्वचितच केला. पण बालवयांतच सत्याचा प्रत्यक्ष साक्षात्कार करून घेण्याच्या जबर इच्छेने त्यांना ग्रासलें होतें. त्याकरिता त्यांनी प्रथमतः आपल्या स्वतःच्या धर्माचा अभ्यास केला. त्यानंतर इतर धर्मांतील सत्यहि मिळविलें पाहिजे असें त्यांनी ठरविलें. आणि त्या कल्पनेप्रमाणे एकामागून एक सर्व पंथांचा त्यांनी स्वीकार केला. अशा वेळीं त्या त्या निरनिराळ्या पंथांच्या भक्तानुयायांसमवेत ते राहत आणि ते सांगतील त्याबरहुकूम पूर्णपणें आपली वागणूक ठेवीत. आणि अशा प्रकारें, त्या विशिष्ट पंथाच्या अंतिम साध्याचा प्रत्यक्ष अनुभव ते आपल्या अंतरंगांत घेत. कांही वर्षांनंतर ते दुसऱ्या एखाद्या पंथाचा स्वीकार करीत. अशा प्रकारें सर्व पंथांची साधना केल्यावर ते या सिद्धान्ताप्रत पोहोचले की हे सर्वच मार्ग आपआपल्यापरी चांगले आहेत. कुठल्याहि

पंथावर टीका करण्याचें त्यांच्या मनांत आलें नाही. कारण त्यांच्या मतें हे सर्व पंथ म्हणजे एकाच अंतिम सत्याकडे जाणारे भिन्न भिन्न मार्ग होत. म्हणून त्यानंतर ते असें म्हणत की, "अशा तऱ्हेचे अनंत मार्ग असणें ही खरोखर किती भाग्याची गोष्ट आहे! कारण जर एकच मार्ग असता तर कदाचित् तो एखाद्या व्यक्तीलाच सोईस्कर झाला असता. पण जितके मार्ग अधिक, तितकी प्रत्येक व्यक्तीला अंतिम सत्य जाणण्याची संधिहि अधिक ! जर एखाद्या विशिष्ट भाषेंतून शिक्षण घेण्याचें मला जमत नसेल, तर दुसऱ्या एखाद्या भाषेंतून शिक्षण घेण्याचा मी प्रयत्न करूं शकेन." अशा प्रकारें सर्व धर्मांचें ते अभीष्ट-चिंतन करीत असत.

मी ज्या गोष्टींचा प्रचार करतों, त्या सर्व गोष्टी म्हणजे माझ्या सद्गुरूंच्या ज्या कल्पना होत्या, त्यांचाच प्रतिध्वनि काढण्याचा एक प्रयत्न आहे. या सर्व गोष्टींत माझें स्वतःचें असें कांहीच नाही. अर्थातच जो कांही भाग वेडावाकडा, चुकीचा अगर फोल असेल तो मात्र माझा

स्वतःचा आहे. पण सत्य आणि शिव अशा प्रकारचा जो जो शब्द माझ्या तोंडांतून केव्हाहि बाहेर पडलेला असेल तो प्रत्येक शब्द हा केवळ माझ्या सद्गुरूंच्या वाणीचा प्रतिध्वनि काढण्याचा एक प्रयत्न आहे. प्रो. मॅक्स मुल्लर यांनी त्यांचें चरित्र लिहिलें आहे; तें तुम्ही अवश्य वाचा.

असो. अशा माझ्या सद्गुरूंच्या चरणापाशी बसून हे सर्व धडे मीं घेतले. त्या वेळीं तेथे मजबरोबर आणखीहि कांही तरुण लोक होते. माझें वय त्या वेळीं सुमारें अठरा वर्षांचें असून मी एक केवळ युवक असा होतों. इतर युवकांपैकी कांही याहूनहि लहान होते व कांही थोडे मोठे होते. एकंदर आम्ही सुमारें बाराजण अगर थोडे जास्त असे होतों. आणि आम्हीं सर्वजण मिळून असें ठरविलें की या आदर्शाचा प्रसार केला पाहिजे. आणि नुसता प्रसारच नव्हे तर मूर्त व्यवहार्य रूपहि दिलें पाहिजे. त्याचाच अर्थ असा की, हिंदूंची आध्यात्मिकता, बौद्धांचें दयाशीलत्व, ख्रिश्चनांची कार्यप्रवणता व मुसल-

मानांचा बंधुभाव, या गोष्टींचा आचार आपल्या रोजच्या जीवनांत आपण प्रत्यक्ष दाखविला पाहिजे. आम्ही असें ठरविलें की " अगदी आजच आणि इथल्याइथेच आपण एका विश्वधर्माची सुरवात करूं. त्याकरिता कालावधीची वाट पाहत बसण्याची आपणांस कांहीहि आवश्यकता नाही."

आमचे सद्गुरु वृद्ध होते. नाण्याचा स्पर्शहि ते आपल्या हातांस होऊं देत नसत. त्यांना अर्पण केलेलें अल्पसें अन्न, अगर थोडेसें साधें सुती कापड, याशिवाय इतर कांहीहि ते घेत नसत. देणगी म्हणून दुसऱ्या कोणत्याहि वस्तूचा स्वीकार करण्याकरिता त्यांचें मन वळवितां येत नसे. त्यांचे विचार जरी असे नावीन्यपूर्ण असत तरी त्यांचें जीवन मात्र कडक शिस्तीचें असे. कारण अशा आचरणामुळेच ते स्वतंत्र राहूं शकत असत. भारतांतील संन्यासी हा आज एखाद्या राजपुत्राचा स्नेही होऊन त्याजबरोबर भोजन करीत असेल, तर उद्या एखाद्या भिकाऱ्याच्या संगतींत राहून झाडाखालीहि झोप

घेत असेल. सर्व प्रकारच्या लोकांशीं त्याला संपर्क ठेवावा लागतो; आणि नेहमी सर्वत्र संचारहि त्याला करावा लागतो. अशा या सततच्या संचारामुळे तो साहजिकच निष्कांचनहि असतो. माझ्या आयुष्यांतील गेलीं चौदा वर्षें मी सतत भटकत राहिलों आहें, आणि कोणत्याहि ठिकाणीं एका वेळेस मी तीन महिन्यापेक्षा अधिक काळ राहिलेलों नाहीं. आम्हां सर्व संन्याशांची हीच पद्धत आहे.

असो. तर या मूठभर युवकांनी पूर्वी उल्लेखिलेले विचार व या विचारांपासून निष्पन्न झालेले सर्व आचरणीय सिद्धान्त, हे आत्मसात् केले. विश्वव्यापी धर्म, गरिबांविषयी आत्यंतिक कळवळा, इत्यादि सर्व गोष्टी सिद्धान्तरूपाने फार चांगल्या असतात, पण तसा त्यांचा प्रत्यक्ष आचार व्हावा लागतो.

त्यानंतर आमच्या सद्गुरूंच्या निर्याणाचा दुःखदायक प्रसंग आला. जेवढी शक्य तेवढी सर्व सेवाशुश्रूषा आम्हीं केली. आम्हांला मित्रपरिवार असा कोणताच नव्हता. विक्षिप्त कल्पना असलेल्या मूठभर पोरांचें कोण

ऐकणार ? अर्थात् कोणीच नाही. निदान भारतांत तरी या वयाचीं मुलें म्हणजे जणु कोण्या झाडाचा पाला. क्षणभर कल्पना करा की दहाबारा मुलें अफाट जनतेला आपल्या उदात्त व उच्च कल्पना सांगत असून त्या प्रत्यक्ष आचरण्यांत आणण्याचा आपला निश्चयहि व्यक्त करीत आहेत ! साहजिकच प्रत्येकास त्याचें हसूं येई. हळूहळू हास्याचें हें स्वरूप गंभीर होऊन त्याने छळाचें स्वरूप धारण केलें. इतकेंच काय, पण या सर्व मुलांना चांगली शिक्षा केली पाहिजे असें प्रत्यक्ष त्यांच्या आई-बापांनाहि आता वाटूं लागलें. पण जों जों आमचा अधिकाधिक उपहास होऊं लागला तों तों आमचा निश्चयहि अधिकच बळकट होत गेला.

त्यानंतर माझ्या स्वतःच्या बाबतींत—आणि त्याचप्रमाणे इतरांच्या बाबतींतहि—खडतर प्रसंग येऊन ठेपला. पण माझ्या वांट्याला आलेला तो दैवदुर्विलास किती भयंकर ! एका बाजूला माझी आई व बंधु हे होते आणि दुसऱ्या बाजूला आमचा दृढ निश्चय होता. माझे वडील

त्यामुळे अनेक देश व परकीय वंश यांना चांगले दिवस लाभणार आहेत, असा माझा विश्वास होता. आणि तो विश्वासहि माझ्या स्वतःच्या जीवितावरील विश्वासाइतकाच अत्यंत दृढ होता. या विश्वासाबरोबरच मला हळूहळू अशीहि स्पष्ट जाणीव झाली की हे भाव जगांतून नष्ट होण्यापेक्षा, त्याकरिता कांही थोड्या लोकांना कष्ट सोसावे लागले तरीहि चालेल. एखादी माता अगर एकदोन भाऊ मृत्युमुखीं पडले म्हणून काय झालें? हा एक यज्ञ आहे, आणि तो होऊं दिला पाहिजे. कोणतीहि मोठी गोष्ट ही त्यागाशिवाय सिद्ध होत नाही. स्वतःच्या शरीरांतून हृदय तोडून काढून, रक्ताने माखलेलें तें हृदय यज्ञ-वेदीवर ठेविलें पाहिजे. असें केलें तरच महत्कार्यें सिद्ध होत असतात. याशिवाय दुसरा कोणता मार्ग आहे? कोणालाहि या-शिवाय दुसरा मार्ग सापडलेला नाही. तुमच्यापैकी ज्यांनी ज्यांनी मोठीं कार्यें केलीं आहेत त्या प्रत्येकास मी या बाबतींत आवाहन करतों. प्रत्येक मोठ्या कार्यास किती-तरी जबर किंमत द्यावी लागलेली असते! किती यातना

आणि किती हाल सोसावे लागलेले असतात ! कोणाच्याहि आयुष्यांतील प्रत्येक यशस्वी कार्यामागे, ते करणाऱ्याने कितीतरी भयंकर क्लेश सोसलेले असतात ! या सर्व गोष्टी तुम्हां सर्वांच्याच परिचयाच्या आहेत.

आणि याप्रमाणे आम्हां मुलांच्या या छोटयाशा मेळाव्याने आपला कार्यक्रम चालूं ठेवला. आमच्या भोवताली जे लोक होते त्यांजपासून आम्हांस फक्त एकच गोष्ट मिळाली—व ती म्हणजे लाथा व शिव्या ! अर्थातच उदरनिर्वाहाकरिता आम्हांला दारोदार भीक मागावी लागे, त्यांत शिळेपाकें टाकाऊ अन्न मिळे व कुठे कुठे कोरभर भाकरहि मिळे. कसेबसें एक पडकें व जुनाट घर आम्हीं मिळविलें. त्यांत जिवंत नाग फुस्कारे टाकीत असत. पण तें घर सर्वांत स्वस्त भाड्याचें असल्याने आम्ही त्यांतच जाऊन राहूं लागलों.

याप्रमाणे आमचीं कांही वर्षें गेलीं. दरम्यान आमच्या कल्पनांना मूर्त स्वरूप देण्याच्या हेतूने सर्व भारतभर आम्हीं पर्यटनें केलीं. होतां होतां दहा वर्षांचा संपूर्ण काळहि

निघून गेला, पण आशेचा एकहि किरण आम्हांस दिसेना. आरंभीचे कांही दिवस व त्यांतच हा आणखी दहा वर्षांचा दीर्घ कालावधि ! तेव्हा पूर्वीपेक्षा शेकडोपट दारुण निराशा आम्हांस वाटूं लागली. पण एका गोष्टीने आमचा आशावाद सतत कायम ठेवला; आणि ती गोष्ट म्हणजे, एकमेकांवरील आमची निष्ठा आणि एकमेकांवरील आमचें नितान्त प्रेम उद्या जरी मी प्रत्यक्ष सैतानासारखा वागूं लागलों तरी मजभोवती असलेले शंभर स्त्रीपुरुष मला म्हणतील की, "हीं पहा आम्हीं सर्व तुमच्याबरोबर आहोंत, आम्ही तुम्हांला कधीहि सोडणार नाहीं." ही गोष्ट मोठ्या भाग्याची आहे. सुखांत अगर दुःखांत, स्वर्गांत अगर नरकांत, तसेंच दुष्काळांत, यातनांत आणि मृत्यूच्याहि दारीं, जो मला कधीच सोडीत नाही तोच माझा मित्र. अशा तऱ्हेची मैत्री ही काय चेष्टेची गोष्ट आहे ? अशा तऱ्हेच्या मैत्रीच्या योगाने मनुष्यास मोक्षपद मिळूं शकेल. तेव्हा आपण जर अशा प्रकारचें प्रेम करूं शकलों तर त्यायोगें आपणांसहि मुक्तिलाभ होऊं शकेल. खरोखर

अशा तऱ्हेची निष्ठा जर आपण आत्मसात् केली तर ध्यानधारणेचें सारसर्वस्वच आपल्या हस्तगत झाल्यासारखें होतें. अशा तऱ्हेची निष्ठा, सामर्थ्य आणि प्रेम हीं जर तुम्हांजवळ असतील तर जगांतील कोणत्याहि देवदेवतांची पूजा करण्याची तुम्हांस जरूरी नाही. आणि नेमकी हीच गोष्ट या सर्व खडतर कालखंडांत आम्हां सर्वांजवळ होती. अगदी निश्चित व पुरेपूर होती. त्याच्याच जोरावर आम्ही हिमालयापासून ते कन्याकुमारी व सिंधु ते ब्रह्मपुत्रा असें पर्यटन करूं शकलों.

याप्रमाणे आम्हां मुलांचा हा छोटासा मेळावा देशांत संचार करूं लागला. हळूहळू आम्ही लोकांचें लक्ष वेधून घेऊं लागलों. त्यांपैकी नव्वद टक्के भावना शत्रुत्वाची असून साहाय्यक अशी फारच थोडी भावना होती. कारण आमच्यांत एक दोष होता; तो म्हणजे आम्ही मुलें होतों. आणि तींहि निर्धन व युवकसुलभ राठपणा असलेलीं अशीं मुलें होतों. ज्याला आयुष्यांत स्वतःच मार्ग काढावयाचा असतो असा मनुष्य थोडाबहुत राठच असतो. कारण

"श्रीयुत अमुक तमुक साहेब अगर श्रीमती अमुक तमुक बाईसाहेब" असें मोठें गोडीगुलाबीने व सभ्यपणाने आवाहन करून कार्य करण्यास त्यास फारसा वेळ नसतो. असा प्रकार तुम्हांला आयुष्यांत नेहमीच दिसून आला असेल. तेव्हा असा मनुष्य म्हणजे जणु पैलू न पाडलेला एक ओबडधोबड हिरा, अगर कसल्यातरी डबींत ठेवलेलें एक रत्न होय, असें म्हटलें पाहिजे.

असो. याप्रमाणे आमचा क्रम चालू होता. "तडजोड अजीबात नाही" हें आमचें ब्रीदवाक्य होतें. "असें असें हें ध्येय आहे आणि हें अमलांत आणलेंच पाहिजे. एखाद्या राजाची गांठ पडली तर त्यालाहि आमच्या ध्येयाची थोडी-बहुत कल्पना दिलीच पाहिजे;" मग त्यांत मरण आलें तरी हरकत नाही. आणि एखादा शेतकरी भेटला तरीहि तेंच." अर्थातच यामुळे आम्हांला लोकांचा वैरभावहि पत्करावा लागला.

पण आयुष्यांतील अनुभव म्हणून एक गोष्ट तुम्ही लक्षांत ठेवा की, जर लोकांचें चांगलें करण्याची तुमची

खरोखर इच्छा असेल तर सर्व विश्व जरी तुमच्याविरुद्ध उभें राहिलें, तरी तें तुम्हांस अपाय करूं शकणार नाही. तुम्ही जर निष्ठावान् आणि खरोखर निःस्वार्थी असाल तर तुमच्यांतील त्या परमेश्वरी शक्तीपुढे त्याचा चक्काचूर होईल. आणि हीं मुलें तर निश्चितच तशीं निष्ठावान् व निस्वार्थी होतीं. खरोखर हीं मुलें म्हणजे जणु काय प्रकृतिमातेने आपल्या हाताने पुढे केलेलीं निरागस व टवटवीत अशीं बालकेंच होत. आमचे सद्गुरु म्हणत की "ज्यांचा सुवास कोणींहि घेतलेला नाही अशींच फुलें व ज्यांना कोणीहि हस्तस्पर्शहि केलेला नाही अशींच फळें, परमेश्वराचे वेदीवर अर्पण करण्याची माझी इच्छा आहे." सद्गुरूंच्या या वचनाने आम्हां सर्वांस चैतन्य प्राप्त होई. कारण जणु काय कलकत्त्याच्या रस्त्यांतूनच गोळा केलेल्या या मुलांच्या भावी आयुष्याची रूपरेषा, त्यांस स्पष्ट दृग्गोचर होती. "हा मुलगा, तसाच तो,— हे पुढे कसे मोठे होतील, तें तुम्ही बघालच" असें त्यांनी म्हटलें म्हणजे लोकांस त्याचें हसूं येई. पण त्यांचा



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ

विश्वास अपरिवर्तनीय होता. ते म्हणत, “प्रत्यक्ष जगन्मातेने मला हें दाखविलें आहे. माझ्या हातून चूक होऊं शकेल पण ज्या वेळीं प्रत्यक्ष जगन्माता 'अमुक गोष्ट अशी आहे' असें म्हणते, त्या वेळीं ती तशी असलीच पाहिजे. कारण जगन्मातेच्या बाबतींत चूक कधीच संभवणार नाही.”

याप्रमाणे असा हा कार्यक्रम चालतां चालतां दहा वर्षांचा काळ लोटला, तरी आशेचा किरण दिसत नव्हता. पण दुसरीकडे माझी प्रकृति मात्र दिवसेंदिवस ढासळत होती. कारण कधी कधी मला रात्रीं नऊ वाजतां एकदाच जेवावें लागे, तर दुसऱ्या एखाद्या वेळीं सकाळीं आठ वाजतां. कधी दोन दिवसांनी अगर तीन दिवसांनी एखादें जेवण मिळे—आणि तेंहि नेहमी भिकारडें व ओबडधोबड असें मिळे. अर्थात् या सर्व गोष्टींचा परिणाम शरीरावर शेवटीं होणारच. मिळणारें अन्न हें भिकारडें व ओबडधोबडच असणार कारण आपल्या जवळची चांगली वस्तु भिकाऱ्याला कोण देणार ? आणि त्यांतूनहि भार-

तांतील लोकांजवळ मुळांतलाच साठा अगदी जेमतेम असतो. केवळ एखादें जेवण मिळण्याकरिता मला बराचसा वेळ पायीं रखडावें लागे, बर्फाच्छादित शिखरावर चढून जावें लागे, आणि कधी कधी दहा मैल पर्वताची कठीण चढण ओलांडावी लागे. भारतांतील खाण्याची रोटी ही आंबवलेली नसते, आणि कधी कधी ती वीस वीस तीस तीस दिवसहि साठवून ठेवलेली असते. या काळांत ती विटेपेक्षाहि अधिक कडक होऊन जाते; आणि मग यांतलाच एखादा तुकडा भिकाऱ्याला दिला जातो. फक्त एखाद्या जेवणाला पुरेसें मिळविण्याकरिता मला अनेक घरीं हिंडावें लागे. आणि त्यांत मिळालेली रोटी इतकी कडक असे की ती खातांना माझ्या तोंडांतून रक्तहि येऊं लागे. ती चावूं म्हटल्यास तुमचा दांत अक्षरशः पडेल, इतकी ती टणक असे. म्हणून मग मी ती एका भांड्यांत ठेवून त्यावर नदींतील पाणी ओतीत असे. कित्येक महिन्यांमागून महिने असें जीवन मला कंठावें लागलें, आणि अर्थातच् त्याचा परिणाम शरीरप्रकृतीवर होत गेला.

नंतर मीं विचार केला की, "भारताचा मीं अनुभव घेतला, आता दुसऱ्या एखाद्या देशाचा अनुभव घेण्याची वेळ आली आहे. त्या वेळीं तुमची सर्वधर्मपरिषद भरावयाची होती आणि त्याकरिता भारतांतून कोणाला तरी पाठवावयाचें होतें. मी एक केवळ भटक्या होतों. पण मीं सांगितलें की "तुम्ही धाडीत असाल तर मी जाईन. त्यामुळे कांही नुकसान होईल असें फारसें मजजवळ कांही नाहीच; आणि जें कांही आहे, तें गेलें तरी त्याची मला क्षिति नाही." पैसे जमविणें ही फार कठीण गोष्ट होती. पण बऱ्याच खटपटीनंतर जेमतेम माझ्या प्रवासास पुरेल एवढी रक्कम त्यांनी गोळा केली. नंतर मी इकडे आलों, पण एकदोन महिने अगोदरच आलों. त्यामुळे ओळखीच्या अभावीं मला वाट फुटेल तिकडे भटकत राहावें लागलें.

शेवटी एकदा सर्वधर्मपरिषद सुरू झाली. मलाहि कांही सहृदय मित्र मिळाले आणि त्यांनी शेवटपर्यंत मला मदत केली. त्यानंतर मीं थोडेंबहुत कामें केलें, कांही रक्कम जम-

विली व दोन वर्तमानपत्रें वगैरेहि चालू केलीं. नंतर मी इंग्लंडला गेलों व तेथेहि कांही काम केलें. त्याच वेळीं भारताकरिता अमेरिकेंतहि कांही काम मीं चालू ठेवलें.

भारतविषयक माझ्या कार्याची संपूर्ण रूपरेषा ही पुढीलप्रमाणे आहे. भारतांत आम्हां साधूंचें जीवन कसें असतें, त्याचप्रमाणे आम्ही दारोदार कसे भटकतों, या विषयी मीं तुम्हांस सांगितलेंच आहे. त्यामुळे तेथे प्रत्ये-काला बसल्या ठिकाणींच धार्मिक शिक्षण मोफत मिळत असतें; फार तर त्याला त्याबद्दल कदाचित् भाकरीचा एखादा तुकडा द्यावा लागत असेल, इतकेंच. त्यामुळेच भारतांतील हलक्यांतल्या हलक्या मनुष्याच्याहि धर्मविष-यक कल्पना या अत्यंत उच्च दर्जाच्या असतात. हें सर्व या साधूंच्या कार्यामुळे घडून येत असतें. पण एखाद्या मनुष्याला तुम्ही "इंग्रज लोक कोण आहेत ?", असें विचारलेंत, तर त्याला उत्तर देतां येणार नाही. कदाचित् तो असेंहि सांगेल की "आपल्या त्या ग्रंथांतून ज्या राक्षसांचा उल्लेख आहे, त्यांचेच हे वंशज आहेत, नाही

का ?" "राज्य कोण करतात ?" असें विचारलेंत तर, "आम्हांस माहीत नाही" असें उत्तर मिळेल. "शासन-पद्धति कसली आहे ?" असें विचारलेंत तर तेंहि त्यांस माहीत नसतें. पण धर्म आणि तत्त्वज्ञान मात्र त्यांस माहीत असतें. इहलोकींच्या या आयुष्यांत नेहमी लागणाऱ्या बौद्धिक शिक्षणाची त्यांचे ठिकाणीं उणीव आहे. या कोट्यवधि लोकांजवळ, त्यांना लागणारी पारलौकिक आयुष्याची सामुग्री तयार असते. तर मग, खरोखर, एवढें त्यांना पुरेसें नाही काय ? नाही—खचित नाही. त्यांना हल्लीपेक्षा अधिक चांगली रोटी व अंगावर अधिक चांगलें वस्त्र मिळावयास हवें. पण विपन्नावस्थेंतील या लक्षावधि लोकांना ही अधिक चांगली भाकरी व अधिक चांगलें वस्त्र कसें मिळेल, हाच मोठा बिकट प्रश्न आहे.

प्रथम मी तुम्हांला असें सांगतों की त्यांच्याविषयी आशेला भरपूर जागा आहे; कारण जगांतील सर्व लोकांत ते लोक स्वभावाने अत्यंत शांत आहेत. याचा अर्थ ते भित्रे आहेत असा मात्र नव्हे. कारण ज्या वेळीं त्यांना

युद्ध करावयाचें असतें त्या वेळीं ते राक्षसासारखे लढतात. इंग्रजांचे सर्वोत्कृष्ट शिपाई हे भारतांतील सामान्य वर्गांतून भरती केलेले असतात मृत्यु म्हणजे त्यांना कःपदार्थ वाटतो. त्यांचें म्हणणें असें की "आतापर्यंत कित्येक वेळां मला मृत्यु आलेला आहे; आणि यानंतरहि अनेक वेळां मला मृत्यु येणार आहे. तेव्हा त्याचें मोठेसें तें काय आहे?" शत्रूला ते कधीहि पाठ दाखवीत नाहीत. ते फारसे भावनाप्रधान नाहीत; पण तरीहि ते उत्तम प्रतीचे योद्धे आहेत.

पण त्यांचा स्वाभाविक कल मात्र शेतीकडे असतो. तुम्ही एकदा त्यांना धार्मिक आचाराचें स्वातंत्र्य द्या, आणि मग वाटल्यास त्यांना लुबाडा, ठार मारा, अगर त्यांच्यावर कर बसवा, किंवा काय वाटेल तें करा, ते शांत आणि सौम्य असेच वागतील. ते स्वतः दुसऱ्यांच्या धर्मांत कधीहि ढवळाढवळ करणार नाहीत. त्यांचें म्हणणें असें की, "आम्हांला आमच्या देवतांचें अर्चन करण्याचें पूर्ण स्वातंत्र्य द्या, आणि मग वाटल्यास बाकीचें सर्व तुम्ही

काढून घ्या." इंग्रजांनी जर त्यांच्या धार्मिक स्वातंत्र्याला धक्का लावला तर मात्र गडबडीस सुरवात होते. १८५७ च्या युद्धाचें खरें कारण हेंच होतें; कारण की, धार्मिक स्वातंत्र्याची झालेली गळचेपी ते बिलकूल सहन करूं शकले नाहीत. भारतांतील लोकांच्या धर्माला धक्का लावल्याबरोबर मोठालीं मुसलमानी राज्येंहि केवळ वाऱ्यासारखीं उडून गेलीं.

पण एवढी बाब वगळल्यास, ते लोक अत्यंत शांतताप्रिय, फार थंड, व अतिशय सौम्य असून, सर्वांत महत्त्वाचें म्हणजे निर्व्यसनी असे आहेत. कैफ आणणाऱ्या कुठल्याहि पेयापासून अलिप्त राहणें ही त्यांचे बाबतींतील फार महत्त्वाची गोष्ट असून, त्यामुळेच इतर कोणत्याहि देशांतल्या सामान्य जनतेपेक्षा ते लोक कितीतरी पटीने अधिक चांगले आहेत. भारतांतील गरीब लोकांच्या वागणुकीची तुलना तुमच्या इकडील गलिच्छ व दाट वस्तींत राहणाऱ्या गरीब लोकांशीं तुम्हांस करतांच येणार नाही. गलिच्छ व दाट वस्तींत राहणारे लोक म्हणजे अर्थातच

गरीब लोक. पण गरीब म्हणजे पापी, असभ्य व व्यसनी असा अर्थ भारतांत केला जात नाही. इतर देशांत प्रत्येकाला उन्नतीच्या इतक्या कांही संधि असतात की फक्त असभ्य आणि आळशी लोकच तेथे गरीब राहूं शकतील. कुणाहि माणसाला गरीब राहण्याचें तेथे वास्तविक कांही कारण नसतें. फक्त मूर्ख अगर गैरवर्तनी लोक—की ज्यांना शहरी जीवन व त्यांतील सर्व चैनी हव्या असतात—हेच काय ते त्या ठिकाणीं गरीब राहूं शकतील. असे लोक खेड्यांत जाणार नाहीत. ते म्हणतील की, "आम्ही येथे असेच शहरी जीवनांत मजेंत राहणार; त्याकरिता तुम्हीं आम्हांस पोसलें पाहिजे." पण अशी परिस्थिति भारतांत नाही. तेथील गरीब बिचारे लोक सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत काबाडकष्ट करून जी भाकरी मिळवितात ती त्यांच्यापासून दुसराच कोणीतरी हिसकून नेतो, आणि त्यांचीं पोरें मात्र उपाशी राहतात. भारतांत लक्षावधि टन गहू पिकत असूनहि, त्यांपैकी जेमतेम एखादा दाणाच शेतकऱ्याचे तोंडांत पडतो. जें धान्य तुम्ही तुमच्या पाळीव

पक्ष्यांनाहि खायला घालणार नाही, असल्या भिकारड्या धान्यावर भारतांतील शेतकरी आपली उपजीविका करीत असतो.

आता तसें पाहिलें तर, त्यांच्यासारख्या लोकांनी इतकी दैन्यावस्था भोगावी, याला कांही कारण नाही. खरोखर ते लोक किती निष्कलंक आणि चांगले आहेत ! भारतांतील या लक्षावधि गरीब लोकांविषयी आणि मागासलेल्या स्त्रीवर्गाविषयी आपण कितीतरी बोलबाला ऐकतों. पण मदतीला मात्र कुणीहि येत नाही. त्याविषयी ते काय म्हणतात पाहा ! ते म्हणतात की, "तुम्ही तुमचें व्यक्तिमत्व सोडून देऊन जर तुमच्यांत बदल केलांत तरच तुम्हांला मदत करतां येईल, व तरच तुमची स्थिति सुधारूं शकेल. जोंपर्यंत तुम्ही हिंदु आहांत तोंपर्यंत तुम्हांला मदत करणें व्यर्थ आहे." असें म्हणणाऱ्या या लोकांना मानवी वंशांच्या इतिहासाचें ज्ञान नसतें. भारतांतील लोकांनी आपला धर्म आणि आपल्या सांस्कृतिक संस्था जर बदलून टाकल्या, तर 'भारत' म्हणून त्याला कांही

अस्तित्वच राहणार नाही. कारण या गोष्टी त्या वंशाच्या प्राण आहेत. आणि अशा तऱ्हेने भारताचें अस्तित्वच जर नाहीसें झालें, तर मग तुम्ही मदत तरी कोणाला करणार ?

आता या ठिकाणीं आणखीहि एक महत्त्वाचा मुद्दा शिकण्यासारखा आहे. तो हा की तुम्ही कुणालाहि अगदी खऱ्याखुऱ्या अर्थाने मदत अशी कधीहि करूं शकत नाही. आपण खरोखर एकमेकांकरिता काय करूं शकतों ? तुम्ही तुमच्या आयुष्याच्या उत्क्रांति-पथावर पुढे जात असता, आणि मी माझ्या स्वतःच्या आयुष्याच्या प्रगति-पथावर पुढे जात असतों. पण भिन्न दिसणारे अनेक मार्ग हे अंतिम साध्याचे ठिकाणीं एकत्र होतात. तेव्हा, हें जाणून तुमच्या त्या उत्क्रांतीला अगर प्रगतीला मी फक्त थोडी चालना देऊं शकतों, इतकेंच. कारण उत्क्रांति अगर प्रगति ही एक धीमेपणाने होत असलेली वाढ आहे. कोणत्याहि राष्ट्राची सभ्यता ही अद्याप पूर्णावस्थेस पोहोचलेली नाही. तेव्हा त्या सभ्यतेलाच अधिक चालना द्या,

म्हणजे ती आपोआप आपल्या साध्याप्रत पोहोचेल. पण ती सभ्यता बदलून टाकण्याचा मात्र प्रयत्न करूं नका. एखाद्या देशाच्या सांस्कृतिक संस्था, आचार व रीतिभाती जर काढून टाकल्या तर मग उरणार तरी काय? कारण ह्याच गोष्टीमुळे तो देश एकसंध झालेला असतो.

पण तरीहि एखादे परकीय महापंडित येतात आणि म्हणतात, 'हें पाहा, तुमच्या या हजारो वर्षांच्या सांस्कृतिक संस्था व रीतिरिवाज तुम्ही सोडून द्या; आणि त्याऐवजी आमच्या या बेगडी व तकलादू वस्तु आधारभूत म्हणून घ्या, म्हणजे तुम्ही सुखी व्हाल." हा सर्व बाष्कळपणा आहे.

आपण एकमेकांस साहाय्य करावयास हवें, हें खरें; पण आपणांस आणखी एक पाऊल पुढे गेलें पाहिजे. पहिली गोष्ट ही की या साहाय्याचे बाबतींत आपण निःस्वार्थी असलें पाहिजे. "मी जसें सांगतों त्याचप्रमाणे जर तुम्ही वागणार असाल, तर मी तुम्हांस साहाय्य करीन, नाहीतर नाही." याला काय मदत म्हणायचें?

आणि त्याचप्रमाणे जर हिंदूंच्या मनांत तुम्हांस पारमार्थिक साहाय्य करावयाचें असेल तर त्या ठिकाणीं सुद्धा कोणत्याहि अटींचा अगर बंधनांचा प्रश्न येतां कामा नये. तें काम पूर्ण निःस्वार्थी असलें पाहिजे. मला जें द्यावयाचें आहे तें मी देऊन टाकून ती गोष्ट तेथेच संपविली पाहिजे. मी जें दिलें, तें दिलेंच. माझें मन, माझ्या शक्ति, आणि माझें जें काय द्यावयाचें आहे तें सर्व मी केवळ देण्याच्याच बुद्धीने देऊन टाकून, त्यापासून मीं कोणतीहि अपेक्षा धरतां कामा नये. पुष्कळ वेळां मीं असे लोक पाहिले आहेत की ज्यांनी अर्धें जग लुबाडलेलें असतें आणि मग त्यांनी हजारो डॉलर्स 'मूर्तिपूजक लोकांचें धर्मांतर' करून त्यांचें कल्याण करण्याकरिता दिलेले असतात. पण खरोखर हे कशाकरिता दिलेले असतात ? मूर्तिपूजकांच्या कल्याणाकरिता, की त्यांच्या स्वतःच्या आत्मिक कल्याणाकरिता ? तुम्हीच या गोष्टींचा आपल्याशीं विचार करा !

पण कुकर्मांची प्रतिक्रिया आपलें काम करीतच असते.

आपण आपले डोळे झाकून स्वतःची फसवणूक करून घेण्याचा प्रयत्न करतों. पण आपलें सत्यस्वरूप जो हृदयस्थ परमेश्वर तो कधीहि कांही विसरत नाही. आपण त्याला कधीच फसवूं शकत नाही, अगर त्याचे डोळे झाकून त्याचेपासून सत्यहि कधी लपवून ठेवूं शकत नाही. जेव्हा खऱ्याखुऱ्या परोपकाराची प्रेरणा उत्पन्न होते तेव्हा त्याचा परिणाम होतोच होतो. आता असा परिणाम होण्यास कदाचित् एक हजार वर्षेंहि लागतील. पण असा प्रतिबंध झाला तरीहि ती प्रेरणा अवश्यमेव जागृत होते व पुन्हा एकदा विजेच्या कडकडाटाप्रमाणे स्फोट घेते. उलटपक्षीं ज्या प्रेरणेचा हेतु मतलबी आणि स्वार्थपरायण असतो, अशी कोणतीहि प्रेरणा इष्ट साध्यास पोहोचूं शकत नाही—मग त्या प्रेरणेचें वर्तमानपत्रांत कितीहि दिमाखाने प्रदर्शन केलेलें असो, अगर भोवतालच्या सर्व लोकांनी आपल्या टाळ्यांच्या गजराने कितीहि मोठें स्वागत केलेलें असो.

मी कांही हें गर्वाने म्हणून सांगत नाही. पण त्या

मुलांच्या छोटयाशा मेळाव्याची मीं सांगितलेली गोष्ट तुम्ही ध्यानांत घ्या. आज भारतांत असें एकहि खेडें नाही, अगर असा एकहि पुरुष अथवा स्त्री नाही, की ज्याला त्यांच्या कार्याची माहिती नाही, अगर जे त्यांना दुवा देत नाहीत. देशांत कोटेहि दुष्काळ पडो तेथे हीं मुलें उडी घेतात, आणि कार्य करून त्यांना शक्य असेल तितक्या लोकांना आपत्तींतून सोडविण्याचा प्रयत्न करतात. आणि हीच गोष्ट हृदयाला जाऊन भिडते. आणि लोकांच्याहि ती ध्यानीं येऊं लागते. एकंदरींत काय की तुम्हांला जेव्हा शक्य असेल तेव्हा अवश्यमेव साहाय्य करा, पण आपल्या हेतूकडे नीट लक्षपूर्वक ध्यान द्या. तुमचा हेतु जर स्वार्थी असेल, तर तुम्ही ज्यांना साहाय्य करणार त्यांनाहि त्याचा फायदा होणार नाही, आणि तुम्हांलाहि त्याचा फायदा होणार नाही. पण तुमचा हेतु जर निःस्वार्थी असेल, तर तुम्ही ज्यांना साहाय्य कराल त्यांना तर तें कल्याणकारक होईलच, पण तें तुम्हांलाहि अनंतपटीने कल्याणकारक होईल. तुम्ही जिवंत आहां

ही गोष्ट जितकी सत्य आहे, तितकीच हीहि गोष्ट सत्य आहे. धूळफेक करून कधीहि परमेश्वराची फसवणूक करतां येणार नाही. तसेंच धूळफेक करून कर्मांचा कायदाहि कधी कुणाला बदलतां येणार नाही.

असो. तर आता माझी योजना म्हणजे भारतांतील या सामान्य जनतेशीं संपर्क घडवून आणावा अशी आहे. असें समजा की सर्व भारतभर तुम्ही गरीबांच्याकरिता शाळा सुरू केल्या, पण तरीहि तुम्ही त्यांना शिक्षण देऊं शकणार नाही. तें कसें तुम्हांला शक्य आहे ? कारण चार वर्षांचा मुलगा तुमच्या शाळेंत येण्यापेक्षा, नांगर धरणें अगर दुसरें कांही काम करणें हें अधिक पसंत करील. त्याला तुमच्या शाळेंत येतां येणार नाही, कारण तें त्याला शक्यच नाही. कां की, जीव जगविणें ही मनुष्याची पहिली जन्मजात प्रवृत्ति आहे. पण ते जर शिक्षणासाठी येऊं शकत नसतील तर मी म्हणतों, शिक्षणाने त्यांच्याकडे कां जाऊं नये ? तेव्हा मी म्हणतों की त्यांच्या घरोघरीं जाऊन तुम्हांस त्यांस शिक्षण कां देतां

येऊं नये ? शेतकऱ्याचा मुलगा जर शिक्षणाकरिता इकडे येऊं शकत नसेल, तर त्याला त्याच्या शेतावर, कारखान्यांत, अगर तो जेथे असेल तेथेच त्याला कां गाठूं नये ? त्याच्या सावलीप्रमाणे त्याचा पाठपुरावा तुम्हीं केला पाहिजे. शेकडो हजारो साधू याचप्रमाणे लोकांना पारमार्थिक शिक्षण देत आहेतच; मग तशाच तऱ्हेने बौद्धिक शिक्षण देण्याचें कार्य त्यांनी करण्यास काय हरकत आहे ? सर्वसामान्य लोकांबरोबर त्यांनी इतिहास अगर तशाच अनेक गोष्टींसंबंधी थोडेंबहुत कां बोलूं नये ? मनुष्याचे कान हे त्याचे सर्वोत्कृष्ट शिक्षक होत. आपल्या मातेकडून आपण जें कानांनी ऐकलेलें असतें, तींच आपल्या आयुष्यांतील उत्तमोत्तम तत्त्वें बनून जातात. पुस्तकांच्या उपयोगास त्यानंतर पुष्कळ मागाहून सुरवात होते. पुस्तकी ज्ञान हें फारच तोकडें असून उत्तमोत्तम विधायक तत्त्वें, हीं आपण आपल्या कानाच्या उपयोगामुळेच मिळवूं शकतों. तेव्हा, शिक्षणाची सुरवात प्रथम अशा तऱ्हेने केल्यानंतर, मग ज्या मानाने त्यांना अधिकाधिक

गोडी वाटूं लागेल, त्या मानाने त्यांनी वाटल्यास तुमच्या पुस्तकांचाहि उपयोग करावा. पण पहिली गोष्ट म्हणजे, हें शिक्षण सर्वत्र व जिकडेतिकडे पूर्णपणें फैलावलें गेलें पाहिजे. माझी योजना ही अशा प्रकारची आहे.

आता मला तुम्हांला असें सांगावयाचें आहे की संन्यासीसंघानेच सर्व काम भागेल असें मानणारा मी नाही. त्यांत मोठे गुण आहेत खरे; पण तसेंच त्यांत मोठे दोषहि आहेत. मठवासी अगर संन्यासी लोक आणि संसारी लोक, या दोहोंमध्ये पूर्ण समतोलपणा असावयास पाहिजे. पण भारतांत संन्यासाश्रमाने सर्व शक्ति आपल्याकडे घेतली आहे. आम्ही संन्यासी म्हणजे उच्चतम शक्तीचें प्रतीक असून, संन्यासी हा राजापेक्षाहि श्रेष्ठ मानला जातो. भारतांतील कोणताहि सिंहासनाधिष्ठित राजा 'भगव्या वस्त्रा'च्या समोर खुशाल बसून राहण्याचें धाडस करणार नाही. तो आपलें आसन सोडून देईल व उभा राहील. आता भारतांतील संन्यासी हे तेथील लोकांच्या संरक्षणाचे जणु बुरूजच आहेत, हेंहि त्याबरो-

ग्रंथ संग्रहालय क्र. ९०८५८

बरच खरें आहे. पण असें असलें तरीहि इतकी मोठी शक्ति—ती चांगल्या लोकांच्या हातांत असली तरीहि—एकाच ठिकाणीं असणें ही गोष्ट वाईट आहे. पुरोहितांचे डावपेच आणि अंतिम सत्याचें ज्ञान या दोहोंच्या दरम्यान संन्याशांचें स्थान असून, ज्ञान आणि सुधारणा यांचें ते केंद्रस्थान आहेत. ज्यू लोकांमध्ये ज्याप्रमाणे 'प्रॉफेट्स' होते त्याचप्रमाणे भारतांत संन्यासी आहेत. 'प्रॉफेट्स' हे नेहमी पुरोहितगिरीच्या विरुद्ध शिकवण देत असून धर्मभोळेपणा नष्ट करण्याचा यत्न करीत असत. तीच गोष्ट भारतांत संन्यासी करीत असतात. पण असें असलें तरी सुद्धा, इतकी मोठी शक्ति त्यांच्या ठिकाणीं असणें हें चांगलें नव्हे; आणि त्याकरिता अधिक चांगल्या पद्धति शोधून काढणें हें जरूर आहे. पण ज्या योगाने सर्वांत कमी प्रतिकार होईल, अशाच मार्गाने तुम्हांस काम करावें लागेल; सर्व देशाचा जीव तर संन्यासाश्रमावर गुंतलेला आहे. तुम्ही भारतांत गेलांत आणि कुठल्याहि धर्माचा प्रचार करूं लागलांत, तर हिंदु लोक तुमच्याकडे पाठ

फिरवितील, आणि चालूं लागतील. पण तेंच जर तुम्ही संसाराचा त्याग केलेले संन्यासी असाल, तर ते म्हणतील की, "ह्या भल्या गृहस्थाने संसाराचा त्याग केलेला आहे. हा जें शिकवितो आहे त्याचप्रमाणे वागण्याचा त्याचा निश्चय आहे. अर्थात् हा प्रामाणिक आहे." माझ्या सांगण्याचा मुद्दा इतकाच आहे की भारतांत संन्यासाश्रम हा एका प्रचंड शक्तीचें प्रतीक आहे. तेव्हा त्याचें स्वरूप बदलून दुसऱ्या स्वरूपांत त्याचें रूपांतर करणें, इतकेंच फक्त आपण करूं शकतों. देशभर संचार करणाऱ्या भारतांतील संन्याशांच्या हातांतील या प्रचंड शक्तीचें रूपांतर करणें, हें आवश्यकच असून त्याच्या योगाने तेथील सामान्य जनतेचा उद्धार होईल.

आता तुम्हांस असें दिसेल की ही सर्व योजना आपण कागदावर नीटपणें मांडलेली आहे. पण त्याबरोबरच, त्याची घडण ही फक्त कांही उच्च कल्पनांच्या दृष्टीनेच मीं केलेली असल्यामुळे आतापर्यंत मीं सांगितलेल्या योजनेचें स्वरूप हें ठोकळमानाचें आणि ध्येय-

रूपाचें असें होतें. पण जसजशीं कांही वर्षें गेलीं, तसतशी ती अधिकाधिक प्रमाणबद्ध आणि मूर्तस्वरूपाची झाली. आणि या योजनेच्या प्रत्यक्ष व्यवहारानंतर, तिच्यांतील दोष वगैरे गोष्टी माझ्या लक्षांत येऊं लागल्या.

प्रत्यक्ष व्यवहारांत ही योजना कार्यान्वित होत असतांना मला काय आढळून आलें ? पहिली गोष्ट ही की, 'लोकांना कसें शिकवावें' याचें शिक्षण संन्याशांना देण्याकरिता कांही केंद्रांची जरूर आहे. उदाहरणार्थ, मला जर एखाद्या मनुष्याला कॅमेरा देऊन बाहेर धाडावयाचें असेल, तर त्याकरिता पहिल्याप्रथम त्या मनुष्याला कॅमेऱ्याविषयीचें ज्ञान देणें आवश्यकच आहे. दुसरें तुम्हांला असें दिसून येईल की, भारतांतील बहुतेक सर्व लोक अगदी अशिक्षित असतात. आणि त्यामुळे त्यांना शिकविण्याकरिता असंख्य केंद्रांची जरूर आहे. आणि मग या सर्वांचा निष्कर्ष काय ? तर पैसा. आता या ठिकाणीं ध्येयवादी वातावरणांतून तुम्ही रोजच्या व्यवहारांत उतरतां. मग पुढे काय ? तर मी स्वतः तुमच्या

देशांत चार वर्षें व इंग्लंडांत दोन वर्षें अशी बरीच मेहनत घेतली. त्यांत कांही स्नेही माझ्या साहाय्यास आले. त्याकरिता त्यांचा मी अतिशय आभारी आहें. त्यांपैकी एकजण आज येथे तुमच्यांत बसले आहेत. कांही अमेरिकन व इंग्रज मित्र मजबरोबर भारतांत आले, आणि तेथील कार्याला अगदी ओबडधोबड अशी सुरवातहि करण्यांत आली. कांही इंग्रज लोक आले आणि त्यांनी आमच्या पंथाचा स्वीकार केला. एकाने तर खूप कष्ट केले व बिचारा भारतांत मृत्यु पावला. आणखी एक सेवानिवृत्त इंग्रज दंपती असून, त्यांची स्वतःची संपत्ति पण आहे. त्यांनी हिमालयांत एक केंद्र चालू केलें असून, मुलांस शिक्षण देण्याचें कार्य सुरू केलें आहे. मीं चालू केलेल्या- पैकी 'The Awakened India'—(प्रबुद्ध भारत)— नांवाचें एक वृत्तपत्र मीं त्यांच्या स्वाधीन केलेलें असून त्याची एक प्रत येथे टेबलावर अवलोकनार्थ ठेवलेली आहे. याप्रमाणे तीं दोघेजण लोकांमध्ये मिळून मिसळून काम करून त्यांस शिक्षण देत आहेत. आणखी एक केंद्र मीं

यास सुरू केलें आहे. कां की, सर्व मोठ्या चळवळींची सुरवात ही साहजिकच राजधानीपासून व्हावी लागते. कारण राजधानी म्हणजे तरी काय ? तर ती म्हणजे एक देशाचें जणु हृदयच आहे. ज्याप्रमाणे शरीरांतील सर्व रक्त हें हृदयाकडे येऊन तेथून सगळीकडे प्रसारित होतें, त्याचप्रमाणे सर्व प्रकारची संपत्ति, सर्व विचार, सर्व शिक्षण व सर्व धार्मिकता हीं प्रथम राजधानीकडे केंद्रित होऊन चहूकडे प्रसारित होतात.

तेव्हा, मला तुम्हांस सांगावयास आनंद वाटतो की, ओबडधोबड का होईना, पण अशा प्रकाराने, मीं कार्यास सुरवात केलेली आहे पण अशाच प्रकारचें कार्य, याच पद्धतीने, मला स्त्रियांचे बाबतींतहि करावयाचें आहे. पण या बाबतींत, 'ज्याने त्याने आपली उन्नति आपण स्वतःच केली पाहिजे' असें माझें तत्त्व आहे. माझें साहाय्य हें दुरून दुरूनच असणार. हें कार्य करण्याकरिता भारतांतील स्त्रिया आहेत, इंग्रज स्त्रिया आहेत व अमेरिकन स्त्रियाहि त्याचप्रमाणे हें कार्य आपल्या शिरावर घेतील अशी मला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्था

आशा आहे. त्यांचेकडून सुरवात झाली की, लगेच त्या कार्यांतून मी माझें अंग काढून घेईन. कोणाहि पुरुषाने, कोणत्याहि बाबतींत, स्त्रीवर हुकमत गाजवूं नये; व त्याच-. प्रमाणे स्त्रीनेहि पुरुषावर हुकमत गाजवूं नये. कारण प्रत्येकाचें व्यक्तिमत्व हें स्वतंत्र व निराळें आहे. या दोघांमध्ये जो काय पाश असावयाचा तो केवळ ममतेचा असावा. स्त्रियांची उन्नति ही त्या स्वतःच करतील; इतकेंच नव्हे, तर पुरुष जी त्यांची उन्नति कधीकाळीं करूं शकतील, त्यापेक्षाहि त्या आपली उन्नति अधिक चांगल्या रीतीने करतील. स्त्रियांच्या बाबतींतील सर्व अवनतीचें व अनर्थाचे कारण म्हणजे स्त्रियांची उन्नति करण्याचें काम पुरुषांनी आपल्या अंगावर घेतलें, हें होय. म्हणून मुळांतच चुकीच्या पद्धतीने मला या कार्यास सुरवात करावयाची नाही. आरंभींची लहानशीहि चूक पुढे वाढत जाते; आणि तुमचें कार्य यशस्वी झाल्यास, त्या लहानशा चुकीने शेवटीं एवढें प्रचंड स्वरूप धारण केलेलें असतें की, तिची दुरुस्ती होणें ही गोष्ट अशक्यप्राय होऊन बसते. तेव्हा

स्त्रियांसंबंधीचें हें कार्य करण्याकरिता मी जर पुरुषांचा उपयोग करण्याची चूक केली, तर ती एक परंपराच निर्माण होऊन बसेल, आणि मग स्त्रिया त्यापासून आपली सुटका कधीहि करूं शकणार नाहीत. पण या बाबतींत मला एक सुंदर संधि मिळालेली आहे. माझ्या सद्गुरूंच्या थोर पत्नीबद्दल—माताजींबद्दल मीं तुम्हांस सांगितलेंच आहे. आम्हां सर्वांना त्यांच्याबद्दल अत्यंत आदर असून, कोणतीहि गोष्ट त्या केव्हाहि आमचेवर बळेंच लादीत नाहीत. तेव्हा अर्थातच त्यांच्या हातांत हें कार्य गेल्यास तें अत्यंत सुरक्षित असें राहील.

कार्याचा हा सर्व भाग अद्याप करावयाचा आहे.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थ
अनुक्रम ............ वि:
क्रमांक ............ नों. दि ......

# आमचें अन्य मराठी प्रकाशन

| | |
|---|---|
| | रु. न.पै. |
| १. श्रीरामकृष्ण-चरित्र–प्रथम भाग (चतुर्थ आवृत्ति) श्री. न. रा. परांजपेकृत | ४–२५ |
| २. श्रीरामकृष्ण-चरित्र–द्वितीय भाग (तृतीय आवृत्ति) श्री. न. रा. परांजपेकृत | ४–३७ |
| ३. श्रीरामकृष्ण-वचनामृत–श्री. 'म'कृत (द्वितीय आवृत्ति) | ५–५० |
| ४. विवेकानंद-चरित्र–श्री. सत्येंद्रनाथ मुजुमदारकृत | ५–२५ |
| ५. स्वामी विवेकानंदांच्या सहवासांत–संकलक–श्री. शरच्चंद्र चक्रवर्ती | ४–५० |
| ६. हिमालयाच्या कुशींत–स्वामी अखंडानंद | २–५० |
| ७. साधु नागमहाशय-चरित्र–(द्वितीय आवृत्ति)–अनु. श्री. वा. सोमण | २–० |
| ८. महापुरुषांच्या जीवनकथा–(सप्तम आवृत्ति)–स्वामी विवेकानंद | १–६२ |
| ९. कर्मयोग–(द्वितीय आवृत्ति)–स्वामी विवेकानंद | १–६२ |
| १०. वेदान्त आणि जीवन–स्वामी विवेकानंद | १–२५ |
| ११. भक्तियोग–स्वामी विवेकानंद | १–२५ |

ग्रं. क्र. १०८५९



१२. पूर्व आणि पश्चिम–स्वामी विवेकानंद १–२५
१३. स्वामी विवेकानंदांच्या आठवणी– १–२५
१४. विवेकानंद-वाणी–(तृतीय आवृत्ति)– ०–९०
१५. शिकागो-व्याख्यानें–(तृतीय आवृत्ति)–
स्वामी विवेकानंद ०–६२
१६. माझे गुरुदेव–(तृतीय आवृत्ति)–स्वामी विवेकानंद ०–६२
१७. हिंदुधर्माचें नवजागरण–(द्वितीय आवृत्ति)–
स्वामी विवेकानंद ०–५६
१८. शिक्षण–(द्वितीय आवृत्ति)–स्वामी विवेकानंद ०–५६
१९. पवहारी बाबा–(द्वितीय आवृत्ति)–
स्वामी विवेकानंद ०–५०
२०. श्रीरामकृष्ण-वाक्सुधा–(चतुर्थ आवृत्ति)–
स्वामी ब्रह्मानंद ०–६२
२१. रामकृष्ण-संघ–ध्येय व इतिहास–
स्वामी तेजसानंद ०–७५

याशिवाय आमच्या आश्रमाने हिंदी भाषेंतूनहि समग्र रामकृष्ण-विवेकानंद साहित्य प्रकाशित केलें आहे. त्यासाठी विस्तृत सूचीपत्र मागवावें.

**श्रीरामकृष्ण आश्रम, धंतोली, नागपूर–१**

REFBK-0010859

तन्नो हंसः प्रचोदयात्

ShivRaj Fine Art Litho Works, Nagpur. 2. Designed by
, V. Pandharkar, at the Nalini Art Service, Dhantoli, Nagpur.